# क्रांतिवीर रंगराव पाटील पुतळा अनावरण सोहळा मंगळवारी

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** क्रांतिवीर रंगराव पाटील पुतळा अनवारण सोहळा व कमला कॉलेज ग्रंथालयाचे 'क्रांतिवीर रंगराव पाटील ग्रंथालय' नामकरण सोहळा मंगळवार (दि. १६) रोजी सकाळी १० वाजता डॉ. व्ही. टी. पाटील स्मृतिभवन येथे होणार आहे. ज्येष्ठ विचारवंत प्रा. एन. डी. पाटील यांच्या हस्ते उद्घाटन होईल. याप्रसंगी माजी आमदार बाबुराव धारवाडे, माजी ग्रामविकासमंत्री अण्णासाहेब डांगे, खा. संजय पाटील, आ. शिवाजीराव नाईक यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन ताराराणी विद्यापीठाचे उपाध्यक्ष प्रा. डॉ. एस. एन. पवार, सचिव प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी केले.

Scanned by CamScanner